संक्षिप्त फौजदारी खटला क्र.९०५/२०२५
निशाणी क्र.१२.

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१ नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.

## गुन्हयाचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | - | ०१/०५/२०२५ |
| २. | अहवालाचा/ फिर्यादीचा दिनांक | - | १२/०५/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नाव, राहण्याचे ठिकाण | - | मोहिनी मुकुंद ठाणगे, वय- ४३ वर्षे, व्यवसाय- घरकाम/दुध व्यवसाय. रा.जायगुडे आखाडा,ता.नेवासा, जि.अ.नगर |
| ४. | आरोपीचे नाव, राहण्याचे ठिकाण | - | दिपक कैलास सिंग, वय- ३५ वर्षे, व्यवसाय- - रा.माळीवाडा,डी.के.रेन्सीडेन्सी फ्लॅट क्र.७ तिसरा मजला, ता. जि. अहमदनगर. |

५. अ. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल.

दिनांक ०१.०५.२०२५ रोजी दुपारी ११.३० वा. चे सुमारास हॉटेल अजिंठा श्रीरामपुर नेवासा रोडवर फिर्यादी व तिचा पती त्यांच्या दुचाकी वरून श्रीरामपुर कडुन नेवासाकडे येत असताना तुम्ही तुमच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्र. एमएच १७ सीएक्स ४५८० ही अविचाराने, हयगईने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने चालवून मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तिला दुखापत अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८१ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

6/10/25

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादी व तिचे पती यास धडक देऊन त्यांना गंभीर दुखापत पोचवली व दुखापतीस कारणीभुत झालात व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम १२५ **(अ)** प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादी व तिचे पती यास धडक देऊन त्यांना किरकोळ दुखापत पोचवली व दुखापतीस कारणीभुत झालात व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम १२५ **(ब)** प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही फिर्यादीच्या मोटर सायकल गाडीला धडक देवुन नुकसान केले व त्यायोगे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ३२४(४)** प्रमाणे गुन्हा केला आहे.

वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही जखमींना वैद्यकीय मदत न देता तेथुन निघुन गेल्याने तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम१३४ **(अ)** सह १७७ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही अपघातची खबर पोलीस स्टेशनला न देता तेथुन निघुन गेल्याने तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम१३४ **(ब)** सह १७७ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन तुमच्या ताब्यतील चारचाकी वाहन क्र. एमएच १७ सीएक्स ४५८० ही वेगाने किंवा धोकादायकपणे चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केलेला आहे.

आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, उपरोक्त आरोपाबाबत या न्यायालयाकडून तुमची न्यायचौकशी करणेत येत आहे.

दिनांक- ०६.१०.२०२५
नेवासा

(डॉ. पी. आर. सुगांवकर,)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
नेवासा